**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७३ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**

दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

**फक्त ५१०००/- रु.**

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १५० वा | मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591

# सत्यम...सत्यम...दीड्डुम...दीड्डुम..! अक्षता सोहळा संपन्न

## ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेला 900 वर्षांची परंपरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांची सिद्धेश्वर महायात्रा यन्नीमज्जन, तैलाभिषेक सोहळ्यानं सुरू झाली आहे. आशियातील सर्वात मोठी आणि सर्वात प्राचीन महायात्रा म्हणून सिद्धेश्वर यात्रेकडं पाहिलं जातं. सोमवारी सकाळी ८ वाजता हिरेहब्बू यांच्या वाड्यात पहिल्या आणि दुसऱ्या नंदीध्वजाची मानकरी राजशेखर हिरेहब्बू आणि देशमुख यांच्याहस्ते पूजा झाली. पूजा झाल्यानंतर नगर प्रदिक्षणेस सुरुवात झाली. यावेळी सिध्देश्वर प्रशालेसमोर कलेक्टर कचेरीच्या जुन्या फाटकाजवळ सरकारतर्फे आहेर करण्यात आला.




**एक हजार वर्षांपासून सिद्धेश्वर महायात्रा :**

सिद्धेश्वर महायात्रेत नंदीध्वजाना मानाचं स्थान आहे. मानाचे सातही नंदी ध्वज सोलापुरातील पारंपरिक मार्गावरुन सिद्धेश्वर मंदिरासमोर असलेल्या संमती कट्ट्यावर दुपारी १ वाजण्याच्या सुमारास दाखल झाले. ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्या हातातील योगदंडाचा कुंभार कन्येशी बाराव्या शतकांमध्ये विवाह झाल्याची आख्यायिका आहे. त्याच श्रद्धेनं सोलापूरच्या सिद्धेश्वर यात्रेत मागील एक हजार वर्षांपासून प्रतीकात्मक अक्षता सोहळ्याची परंपरा सुरू आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पालिका आयुक्त शीतल तेली उगले, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, भाजपा आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी आदींच्या उपस्थितीत मानकऱ्यांनी अक्षता सोहळा संपन्न झाला.

**लिंगागी अर्थात योग असलेले सिद्धेश्वर महाराजांची कथा :**

ग्राम दैवत सिद्धरामेश्वर महाराजांच्या कुटीबाहेर एक



कुंभाराची कन्या दररोज सकाळी सडा मारून रांगोळी काढत असे. ही गोष्ट सिद्धेश्वर महाराजांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या कुंभार कन्येला तिची अपेक्षा विचारली असता, तिनं सिद्धेश्वरांशी विवाह करू इच्छित असल्याचं सांगितलं. तेव्हा सिद्धेश्वरांनी अत्यंत नम्रपणे आपण लिंगागी असल्यानं विवाह करू शकत नसल्याचं सांगितलं. मात्र, तरीही कुंभार कन्येनं हट्ट केल्यावर त्यांनी तिला आपल्या योगदंडाशी विवाह करण्याचा सल्ला दिला. त्याच विवाहाचं प्रतीक म्हणून सोलापुरात मकर संक्रांतीला हा विवाह सोहळा संपन्न होतो, अशी आख्यायिका आहे. त्याला अक्षता सोहळा म्हणतात. या विवाहाच्या दुसऱ्याच दिवशी ती कुंभार कन्या सती जाते, अशी अख्यायिका आहे. त्यामुळं मंगळवारी सोलापुरातल्या होम मैदानावर होमविधी पार पाडतो.

प्रमुख विधी होतात संपन्न : ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या महायात्रेत हळदी, विवाह आणि होमहवन हे तीन प्रमुख विधी आहेत. होम म्हणजे प्रेमासाठी सती जाणे ही त्यागाची गोष्ट घडलेली असल्याचं सांगितलं जातं. या घटनेला सर्व समाज साक्षीदार असल्यानं या यात्रेत ७ समाजाच्या मानाच्या ७ काठ्या निघतात. भाविक मोठ्या श्रद्धेनं या महायात्रेला हजेरी लावतात. आशिया खंडातील सर्वात मोठी यात्रा म्हणून या यात्रेचा उल्लेख होतो. सिद्धेश्वर महायात्रा ही यात्रा आजपासून एक महिनाभर चालते.

**सुगडी पूजेला अनन्यसाधारण महत्व :**

सोलापूर शहरातील दत्त चौक, माणिक चौक, विजापूर वेस, जिल्हाधिकारी कार्यालया समोरुन ही मिरवणूक सिद्धेश्वर मंदिर परिसरात असलेल्या संमती कट्ट्यावर पोहोचली. या ठिकाणी सिद्धरामेश्वरांच्या हातातील योगदंडाच्या साक्षीनं सुगडी पूजा करण्यात आली. महायात्रेचे मानकरी कुंभार यांना हिरेहब्बू यांच्याहस्ते विडा दिला गेला. त्यानंतर संमती कट्ट्यावर सर्व मानकरी आल्यानंतर तम्मा शेटे यांनी संमती (अक्षता) वाचन केली. हा अभूतपूर्व असा सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते.

**महाराष्ट्र , आंध्रप्रदेश आणि कर्नाटकातील भाविक दाखल:**

नंदीध्वज नगर प्रदक्षिणेसह तैलाभिषेक सोहळा पार पडला. सोलापूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेला जवळपास 900 वर्षांची परंपरा आहे. यात्रेला केवळ सोलापूरच नाही महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यातून देखील भाविक येत असतात. श्री सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा ही सोलापूरमध्ये 'गड्डा यात्रा' म्हणून ओळखली जाते.

## प्रमोद गायकवाड हा सोलापूरचा वाल्मीक कराड; तरुणाच्या हत्येनंतर नागरिकांकडून संताप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरण सर्वत्र गाजत आहे. बीडच्या सरपंचाचं हत्या प्रकरण ताजं असताना सोलापूरमध्येही एका तरुणाची हत्या झाल्याची घटना घडली आहे. या हत्येच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी कॅन्डल मार्च काढत संताप व्यक्त




केला. या हत्याकांडातील आरोपी प्रमोद गायकवाड हा सोलापूरचा वाल्मीक कराड असून त्याची शरद पवार गटातून हाकलपट्टी करा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली.

सोलापूरच्या सिद्धार्थ नगरमध्ये वैभव वाघे नावाच्या तरुणाची हत्या करण्यात आली. वैभवच्या हत्येनंतर सोलापुरात सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. या हत्येच्या निषेधार्थ सोलापूरच्या सिद्धार्थनगर येथील वैभव वाघे नावाच्या तरुणाच्या हत्येच्या निषेधार्थ कॅन्डल मार्च काढण्यात आला. वैभव वाघे याचा मारहाणीत मृत्यू झाला. वैभव वाघे हत्या प्रकरणात शरद पवार गटाचे प्रमोद गायकवाड यांच्यासह त्यांच्या साथीदारांवर गुन्हे दाखल करण्यात आली आहेत.

वैभव वाघे या तरुणाच्या हत्येच्या निषेधार्थ श्रद्धांजली वाहण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर मेणबत्ती लावून श्रद्धांजली वाहण्यात आली. सोलापुरातील विचार क्रांती बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून सोलापूर शहरातून काढण्यात कॉण्डल मार्च आला. प्रमोद गायकवाड हा सोलापूरचा वाल्मीक कराड असून त्यामुळे त्यांची राष्ट्रवादी शरद पवार पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तसेच वैभव वाघे हत्या प्रकरणात अटकेत

(पान 2 वर..)

## संतोष देशमुख हत्याप्रकरणी ग्रामस्थांचा सरकारला अल्टिमेटम

### ३५ दिवसांनंतरही आरोपींना कठोर शासन झालेलं नसल्यामुळे राज्यभरातून संताप

**बीड (कटूसत्य वृत्त):-** संतोष देशमुख हत्याप्रकरणाला महिना उलटला तरीही त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळालेला नाही. वाल्मिक कराडविरोधात मकोका लावण्यात आलेला नाही. तर, एक आरोपी अद्यापही फरार आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, आज याविरोधात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी आंदोलनही केले होते. हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असून सरकारला उद्या सकाळी १० वाजेपर्यंत अल्टिमेटम देण्यात आला आहे.

वाल्मिक कराड वगळता इतर आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, विरोधी व सत्ताधारी पक्षांमधील नेते, आमदार वाल्मिक कराडवर कारवाई व्हावी यासाठी आंदोलन करत आहेत. दुसऱ्या बाजूला संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या जात आहेत. भावाच्या मारेकऱ्यांना शिक्षा व्हावी यासाठी धनंजय देशमुख कायदेशीर लढाई लढत आहेत. मात्र, त्यांना ही लढाई लढण्यापासून रोखण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे




संतापलेल्या धनंजय देशमुख यांनी आज (१३ जानेवारी) आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी पोलीस तपासावर नाराजी व्यक्त केली.

तसेच, मोबाइल टॉवरवर चढून जीव देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानुसार आज ते टॉवरवर चढले. तर, मस्साजोगच्या ग्रामस्थांनी देखील गावात तीव्र आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी आत्महत्या करू नये यासाठी प्रशासन व अनेक नेत्यांनी त्यांची विनंती केली. मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांनी देखील धनंजय देशमुखांना विनवण्या केल्या. त्यानंतर तब्बल दोन तासांनी त्यांनी आपलं आंदोलन थांबवलं व ते टॉवरवरून खाली उतरले. मात्र, ३५ दिवसांनंतरही कोणत्याही आरोपीला कठोर शासन झालेलं नसल्यामुळे राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे.

**ग्रामस्थांची आक्रमक भूमिका**

आंदोलन स्थगित केल्यानंतर धनंजय देशमुख यांनी माध्यमांनी संवाद साधला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीनेही भूमिका मांडण्यात आली. त्यातील एका ग्रामस्थाने म्हटलं की, 'मनोज जरांगे यांच्या विनंतीनंतर मी हे आंदोलन स्थगित केलं आहे. उद्या सकाळी १० वाजेपर्यंत गावकऱ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर उद्या ब्रह्मदेव आला तरी आम्ही थांबणार नाही. आज मी एकटाच आत्मदहन करणार होतो, पण संपूर्ण गाव अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करू', असा इशारा त्यांनी दिला आहे.

## सोलापूरात कर संकलन विभागाची कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या मिळकतकारांच्या थकबाकी पोटी कर संकलन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विशेष जप्ती मोहिमेत मुरारजी पेठेतील पाच गाळे तर उत्तर सदर बझार, पाच्छा पेठ परिसरातील मिळतदारांचे आठ नळ तोडण्याची कारवाई करण्यात आली.

थकबाकी मिळकतदारांच्या विरोधात महापालिकेच्या कर संकलन विभागाच्यावतीने विशेष जप्ती मोहीम राबवण्यात येत आहे. मालमत्ता सील करणे, नळ तोडणे अशी कारवाई केली जात आहे. विशेष जप्ती मोहिमेत मुरारजी पेठेतील मंजुनाथ गोधारे यांच्या कडील 92 हजार 652, सुमित मिरजकर यांच्याकडील 97 हजार 988, मौनिद्दीन जाहगिरदार 29 हजार 698, सारंग बोबडे 38 हजार 291, प्रकाश पाटील यांच्याकडील 29 हजार 68,



थकबाकी पोटी यांचे प्रत्येकी एक याप्रमाणे पाच गाळे सील करण्यात आले.

तर उत्तर सदर बझार परिसरातील विजय घोडके 36 हजार 653, कुंची कूरवे यांच्याकडील 39 हजार 744,गोविंद गडगी 36 हजार 813, लक्ष्मण गडगी यांच्याकडील 28 हजार 892, नरसय्या दासरी यांच्याकडील 47 हजार 513, सरोजनी बडदाघे यांच्याकडील 1 लाख 9 हजार 591 तर मुस्लिम मंच यांच्याकडे असलेल्या 1 लाख 40 हजार 835 थकबाकी पोटी प्रत्येक मिळतदारांचा पाणीपुरवठा खंडित केला आहे.

ही कारवाई पालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशाने उपायुक्त अशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करसंकलन अधिकारी युवराज गाडेकर यांच्या पथकांनी केली.

## सोलापुरात ट्रेनवर दगडफेक, प्रवाशांना दुखापत, गुन्हा दाखल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात गेल्या दहा दिवसांत दुसऱ्यांदा रेल्वेवर दगडफेक झाल्याची बातमी समोर आली असून, त्यानंतर प्रवाशांचे हाल होत आहेत. सोलापूर विभागात रेल्वेवर दगडफेक होण्याची दहा दिवसांत ही दुसरी वेळ आहे. पारेवाडी ते वाशिंबे दरम्यान मुंबई-चेन्नई एक्सप्रेसवर दगडफेक करण्यात आली.या दगडफेकीमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शनिवारी रात्री अज्ञात हल्लेखोरांनी मुंबई-चेन्नई एक्सप्रेस,वर दगडफेक केली. अपंगांच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला दगडफेकीत किरकोळ दुखापत झाली असून त्याच्यावर तातडीने प्राथमिक उपचार करण्यात आले. या दगडफेकीत अपांगच्या डब्यात बसलेल्या प्रवाशाला दुखापत झाली असून त्याच्यावर तातडीने प्राथमिक उपचार करण्यात आले. रेल्वेच्या काचा फुटल्या आहे. या प्रकरणी सोलापुर रेलवे पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिस प्रकरणाचा तपास करत आहे.







## खिशाला कात्री! राज्यात प्रवास महागणार; रिक्षा-टॅक्सी आणि एसटीचे तिकीट १५ टक्क्यांनी वाढणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** रिक्षा, टॅक्सी, एसटी बसने प्रवास करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. राज्यातील प्रवास आता महागणार आहे. रिक्षा, टॅक्सी आणि एसटीच्या तिकीटाचे दर १५ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

राज्यातील महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रासह राज्यभरातील प्रवास महागणार आहे.

राज्य सरकारने परिवहन विभागाचा आढावा घेतला. रिक्षा,



टॅक्सी, एसटी तसेच राज्यातल्या विविध शहरांमधील बस तिकीट दरांमध्ये १५ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या खिशाला आणखी कात्री लागणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रिक्षा, टॅक्सीच्या भाड्यात ३ ते ४ रुपयांनी, तर बसच्या तिकीट दरामध्ये १ ते ५ रुपयांनी वाढ होण्याची शक्यता आहे. येत्या १५ जानेवारीला म्हणजे बुधवारी होणाऱ्या बैठकीत या भाडेवाढीच्या प्रस्तावावर शिक्कामार्तब होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच परिवहन विभागाचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मुख्यमंत्र्यांनी टॅक्सी, रिक्षा, शहरातील बससेवेच्या तिकीटदरांसंदर्भात निर्णय घेण्याबाबत निर्देश दिले होते.

इंधनाच्या वाढत्या दरामुळे रिक्षा, टॅक्सीचालक

(पान 2 वर..)

## संपादकीय

# पुन्हा स्वबळाचे सूर

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना स्वबळावर लढवेल अशी घोषणा केली.त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये पुन्हा एकदा स्वबळाचे सूर आळवले गेले. विधानसभा निवडणुकीतील धक्कादायक पराभवानंतरच उद्धव ठाकरे यांनी स्वबळाचे संकेत दिले होते. आता संजय राऊत यांनी थेट अशा प्रकारची घोषणा केली असल्यामुळे लवकरच होर्णाया महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी विघटित स्वरूपात मतदारांना सामोरी जाईल असे दिसते. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या या घोषणेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी दिलेली प्रतिक्रिया अपेक्षित आहे. एकीकडे सत्ताधारी महायुती महापालिका निवडणूकसुद्धा एकत्रपणे लढवण्याचे नियोजन करत असताना महाविकास आघाडीमध्ये असे विघटन झाले, तर स्थानिक पातळीवरही सत्तांतर होण्याची भीती महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी लक्षात घ्यायला हवी. गेली अनेक वर्षे मुंबई महापालिकेमध्ये शिवसेनेची सत्ता आहे. ही सत्ता मिळवण्यासाठी आणि कायम ठेवण्यासाठी भाजपने पूर्वी शिवसेनेला अनेक वेळा मदत केली आहे. काही वर्षांपूर्वीच्या निवडणुकीमध्ये भाजपच्या जास्त जागा निवडून आल्या असूनही महापौरपदाचा मान तेव्हा भाजपने शिवसेनेला दिला होता. आता शिवसेनेतील फुटीनंतर चित्र बदलले आहे आणि मुंबई महापालिकेतील नगरसेवकांमध्येही त्याच प्रकारे फूट विभागली गेली आहे. काही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे आहेत, तर काही नगरसेवक उद्धव ठाकरे यांच्याकडे आहेत. या परिस्थितीमध्ये जर पुन्हा एकदा सत्ता मिळवायची असेल तर खरे तर उद्धव ठाकरे यांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या मदतीची गरज आहे. पण एकदा होऊनच जाऊ द्या, या भूमिकेतून शिवसेनेने आता स्वबळावर लढण्याचा नारा दिला आहे. कोण किती पाण्यात आहे हे या निमित्ताने समजणार असले तरी काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस यांना गमावण्यासारखे काहीच नाही. कारण या दोन पक्षांची आतापर्यंतच्या महापालिका निवडणुकीमधील कामगिरी दखलपात्र अशी नाही. पण दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला मात्र बरेच काही सिद्ध करायचे आहे. मुंबई महापालिकेवर जर त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा झेंडा आणायचा असेल, तर त्यांना भाजपची आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मदत लागणारच आहे. ज्या प्रकारे गेल्या काही दिवसांमध्ये भाजपच्या नेत्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांच्याबरोबर संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे ते पाहता महायुतीमध्ये या निवडणुकीसाठी एखादा चौथा भिडूसुद्धा येऊ शकतो. याच परिस्थितीमध्ये दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी मात्र स्वबळाचा नारा दिला आहे. मुंबई महापालिकेच्या क्षेत्रामध्ये जरी अजूनही उद्धव ठाकरे यांच्या नावाचा करिष्मा असला तरी विधानसभा निवडणुकीमध्ये मुंबईतील मतदार उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभे राहिले नाहीत. अशाच प्रकारची स्थिती पुणे, नागपूर, नाशिक आणि ठाणे या इतर महापालिकांमध्ये असणार आहे. भाजपच्या शिर्डी येथे सुरू असलेल्या राज्य अधिवेशनामध्येसुद्धा आता एक युद्ध जिंकलं पुढच्या युद्धासाठी सराव चालू ठेवा अशा प्रकारची घोषणा करण्यात आली. पुढील युद्ध म्हणजे महापालिका निवडणूक हेच असणार आहे. उद्धव ठाकरे किंवा महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांची ताकद अजून कमजोर करायची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्येसुद्धा त्यांना धक्का देणे गरजेचे आहे याची जाणीव भाजपच्या नेत्यांना आहे. मुंबई महापालिकेमध्ये जर ठाकरे यांची सत्ता गेली तर तो एकनाथ शिंदे यांच्यासाठी आणि भाजपसाठीसुद्धा महत्त्वाचा विजय ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीतील चांगल्या विजयानंतर विधानसभा निवडणुकीमध्ये जोरदार फटका बसल्यानंतर खरे तर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसाठी महापालिका निवडणुकीमध्ये चांगली कामगिरी करून दाखवणे हाच एक उद्देश असू शकतो. पण स्वबळाचा नारा देत असताना या उद्देशाकडे दुर्लक्ष होत आहे की काय याचा विचार त्यांना करावा लागणार आहे. शिवनेतील फुटीनंतर मतदारांची विभागणी झाली आहे आणि त्याचा फायदा विधानसभा निवडणुकीमध्ये एकनाथ शिंदे यांच्या गटाला झाला. महापालिकेसारख्या निवडणुकीमध्येसुद्धा मतदारांची विभागणी कोणत्या गटाच्या बाजूने जास्त जाते त्यावर यश अवलंबून राहणार आहे. एकत्रित महायुतीच्या समोर जर महाविकास आघाडीचे विविध घटक पक्ष स्वतंत्रपणे उभे ठाकले तर त्याचा फायदा महायुतीलाच होणार आहे हे गृहीत आहे. पण एकदा आपली स्वबळाची ताकद अजमावून बघण्यासाठीच बहुदा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने हा नारा दिला आहे.एकीकडे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसला पाठिंबा न देता उद्धव ठाकरे यांनी आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन इंडिया आघाडीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केलेच आहे आणि आता महाराष्ट्राच्या पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये स्वबळाचा नारा देऊन त्यांनी महाविकास आघाडीच्या अस्तित्वाबाबतही प्रश्नचिन्ह समोर आणले आहे. एखाद्या निवडणुकीतील विजयानंतर विजयी आघाडी जास्त मजबूत होते पण निवडणुकीतील पराभवानंतर मात्र अशी एखादी आघाडी विघटित होऊ लागते याचाच हा पुरावा आहे. महापालिका निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. जेव्हा निवडणुका जाहीर होतील त्या कालावधीमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात काहीही होऊ शकते.

## खिशाला कात्री...

संघटना, एसटी महामंडळ आणि ठाणे, नवी मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर या शहरांतील परिवहन विभाग भाडेवाढीची गेल्या अनेक दिवसांपासून मागणी करत आहेत. सप्टेंबर २०२२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ झाली होती. रिक्षाच्या भाड्यात २ रुपयांनी आणि टॅक्सीच्या भाड्यामध्ये ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यामुळे रिक्षाचे किमान भाडे २१ रुपयांवरून २३ रुपयांवर गेले. तर टॅक्सीचे भाडे २५ रुपयांवरून २८ रुपयांपर्यंत गेले.

गेल्या २ वर्षांत प्रवासी भाड्यात वाढ झालेली नाही त्यामुळे रिक्षाचालक संघटनांनी पुन्हा भाडेवाढीसाठी सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. ही संघटना गेल्या अनेक दिवसांपासून भाडेवाढीची मागणी करत आहे. खटुआ समितीच्या शिफारशीनुसार भाडेवाढ मिळावी, अशी संघटनांची मागणी आहे.

सरकारकडे रिक्षा, टॅक्सीचालक संघटना, एसटी महामंडळ आणि इतर शहरांतील परिवहन उपक्रमांनी भाडेवाढीसंदर्भात विविध प्रस्ताव दिले आहेत. यासंदर्भात एकत्रित निर्णय घेतला जाणार आहे. ही दरवाढ किमान १५ टक्के असण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव तयार असून आता १५ जानेवारीला होणाऱ्या बैठकीमध्ये यावर निर्णय होणार आहे.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा; स्तुत्य उपक्रम

वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तीमत्त्वाचे भरणपोषण होण्यास आणि सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. अलीकडच्या काळात वाचन संस्कृतीपासून दुरावत चाललेल्या तरुण वगार्ला वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून 1 ते 15 जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी या उपक्रमात सहभागी होऊन विविध कार्यक्रम राबवित आहेत. आपण सर्वांनीही 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमात सहभागी होऊन वाचनाची सवय अंगिकारुया !

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत दरवर्षी सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा असे विविध कार्यक्रमांचे आयोजन या पंधरवड्यात करण्यात यावे. पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा 16 जानेवारी रोजी प्रत्येक महाविद्यालयात घेण्यात यावी. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रातील पुस्तक निवडून संपूर्ण पुस्तकाचे सखोल वाचन करावे. आणि आपल्या आकलनाप्रमाणे वाचलेल्या पुस्तकावर चिंतनात्मक व समीक्षणात्मक परिक्षण निबंध लिहून तो संयोजकाकडे सुपूर्द करावा किंवा ठरलेल्या दिनांकास त्या निबंधाचे कथन करावे. प्रस्तुत परिक्षण निबंध किमान 500 शब्दांचा असावा किंवा त्याचे 5 मिनिटे कथन करावे, वाचनासाठी विद्यार्थ्यांना कुठल्याही भाषेचे आणि कुठल्याही विषयाचे (साहित्यापासून ते तंत्रज्ञानापर्यंत) पुस्तक निवडीचे स्वातंत्र्य असेल. निवडलेले पुस्तक हे प्रवेशित विद्यार्थ्यांचे क्रमिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त असावे.

पुस्तकाची निवड करण्यासंदर्भात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सहकार्य, मार्गदर्शन करावे. वाचनीय पुस्तकांची यादी सूचना फलकावर दर्शनी भागात लावावी. महाविद्यालयाने, सार्वजनिक ग्रंथालयाने विद्यार्थ्यांची मागणी व पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत. या स्पधेर्चे आयोजन करुन परिक्षकांकडून 3 उत्कृष्ट परिक्षण निबंधाची, कथनाची निवड करण्यात यावी आणि त्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र, बक्षीस महाविद्यालयाकडून देण्यात यावीत. स्पधेर्तील विजेत्या परिक्षण निबंधाचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये करावा.

सुसंस्कृत समाज घडवण्यासाठी आणि स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी निरंतर वाचनाची सवय जोपासावी. चला तर मग ज्ञान, कल्पकता आणि आत्मविश्वासासाठी नियमितपणे वाचन करण्याचा व वाचनातून समाजासाठी उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याचा संकल्प करुन 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊया!

# अकलूज येथील भव्य लेझीम स्पधेर्चा समारोप

## सदाशिवराव माने विद्यालयाने तीनही गटात मारली बाजी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ,अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 9 ते 11 जानेवारी 2025 या कालावधीत आयोजित केलेल्या 19 व्या भव्य लेझीम स्पर्धेत सदाशिवराव माने विद्यालय अकलूजच्या शहरी मुले, मुली व प्राथमिक या तीनही गटाने प्रथम क्रमांक पटकावला.बक्षीस वितरणाने या स्पधेर्चा समारोप झाला. विजय चौक अकलूज येथे संपन्न झालेल्या स्पधेर्साठी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, कार्याध्यक्षा कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते पाटील, शंकरराव माने देशमुख,दीपक खराडे पाटील,सतिशराव माने देशमुख, अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे पाटील, नितीन निंबाळकर, महादेव अंधारे, सुभाष दळवी, नारायण फुले, पांडुरंग एकतपुरे, रामचंद्र गायकवाड, अनिल कोकाटे,आप्पासाहेब मगर यांचेसह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जयसिंह मोहिते पाटील व कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्यासह उपस्थित महिला पालकांनीही लेझीमचा डाव सादर केला. हलगीच्या तालावर त्यांनी ठेका धरला. उपस्थितांनीही त्यांना मनमुराद दाद दिली.

**जयसिंह मोहिते पाटील म्हणाले,**

मोबाईल आणि टीव्हीमुळे मुले मैदानावर खेळत नाहीत. लेझीम खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते. स्पर्धेत मुलांसह मुलींचाही सहभाग मोठा आहे. त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या सर्व पालकांचेही कौतुक आहे. स्वरुपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या,संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळांने मागील 19 वषार्पासून लेझीम स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण परंपरा जतन केलेली आहे सुमारे. सुमारे 60 हजारपेक्षा अधिक खेळाडू तयार झाले आहेत. मंडळाचे हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. हा लेझीम खेळ स्पर्धेपुरता मर्यादित न ठेवता आपल्या गावामध्येसुद्धा कायम चालू ठेवला पाहिजे.

**स्पधेर्चा निकाल -- (प्राथमिक गट)**

प्रथम- सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग अकलूज, द्वितीय महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग यशवंतनगर, तृतीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक विभाग मांडवे.

खुला गट -(मुली) श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील महिला वसतिगृह अकलूज.(मुले) प्रथम कर्मवीर बाबासाहेब माने पाटील विद्यार्थी वसतिगृह मोरोची व विजय विद्यार्थी वसतिगृह अकलूज आणि शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज. ग्रामीण गट (मुले) प्रथम मोरजाई विद्यालय मोरोची, द्वितीय श्री सावता माळी विद्यालय माळेवाडी, तृतीय सदाशिवराव माने विद्यालय माणकी व श्री बाणलींग विद्यालय फोंडशिरस.(मुली) प्रथम सावतामाळी विद्यालय माळेवाडी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला नातेपुते, द्वितीय श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस, तृतीय श्री चक्रेश्वर माध्यमिक विद्यालय चाकोरे.

शहरी गट (मुली) प्रथम जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, सदाशिवराव माने विद्यालय अकलूज व महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, द्वितीय लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, प्रोत्साहनपर श्री हनुमान विद्यालय लवंग. (मुले) प्रथम सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, द्वितीय महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, तृतीय श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय वाघोली व कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर.

या स्पधेर्साठी प्रथम क्रमांकास रुपये ५ हजार,चषक व प्रशस्तीपत्र , द्वितीय क्रमांक ४ हजार, तृतीय क्रमांकास रुपये ३ हजार सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र अशी बक्षिसे देण्यात आली. याचबरोबर उत्कृष्ट प्रशिक्षक सुभाष चव्हाण, उत्कृष्ट हलगी वादक विकास कांबळे, उत्कृष्ट घुमके वादक प्रदीप मस्के, उत्कृष्ट सनई वादक बंडू केंगार व उत्कृष्ट झांज वादक सदाशिव आरडे यांना रोख रक्कम बक्षीस,सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तीन दिवसात या स्पर्धेमध्ये एकूण 55 संघातून सुमारे 2150 खेळाडूंनी आपला खेळ सादर केला.मंडळाचे सर्व पदाधिकारी,सदस्य यांनी ही स्पर्धा उत्कृष्टपणे पार पडण्यासाठी परिश्रम घेतले.

# रत्नाई कृषी कन्यांची सेंद्रिय शेतीला भेट



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण प्रसारक मंडळाच्या रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी माळीनगर येथील सेंद्रिय शेती करणारे प्रगतशील शेतकरी व्ही. वाय .गवळी व डी .ए. थोरवे यांच्या सेंद्रिय शेतीला भेट दिली .त्यावेळी त्यांनी शेती करताना रसायनाचा वापर न करता केवळ शेतातील पिकांचे अवशेष ,शेण ,गोमूत्र व नैसर्गिक साधनांचा वापर करून सेंद्रिय शेती केली पाहिजे असे सांगितले. हरित क्रांती पूर्वी शेतामध्ये केवळ शेणखत वापरुन शेती केली जात होती. यामुळे पिकांची गुणवत्ता वाढत होती. हरित क्रांती नंतर रासायनिक खतांचा अवलंब देशात जास्त प्रमाणात होऊ लागला. .सुरुवातीच्या काळात शेतमाल मोठ्या प्रमाणावर मिळू लागला. बहुतांश राज्य जास्त उत्पन्न मिळावे म्हणून रसायनांचा अतिवापर करीत ,परिणामी कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराचा प्रश्न निर्माण झाला . त्यामुळे आजच्या या आधुनिक युगात सेंद्रिय शेती तसेच त्याचे महत्त्व वाढत चालले असल्याचेही त्यांनी सांगितले.

या मध्ये कृषी कन्या प्रतीक्षा बनसोडे, जिजाऊ बरडे ,सोनाली गायकवाड, कोमल लाड ,इशा घोगरे, स्नेहल तांबोळकर ,प्राची जाधव, प्रणाली यादव , प्रतीक्षा हेगडे यांचा समावेश होता. प्राचार्य आर .जी. नलवडे, कार्यक्रम समन्वय प्रा. एस. एम. एकतपुरे, प्रा.एम. एम. चंदनकर आणि प्रा. एच. व्ही. कल्याणी यांचे मार्गदर्शन लाभले.

पान १ वरून

# प्रमोद गायकवाड...

असलेल्या आरोपींना शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**बहिणीने सांगितला हत्येचा घटनाक्रम**

वैभव वाघची बहीण रूपाली जाधव यांनी प्रतिक्रिया दिली. रुपाली म्हणाल्या, '३१ डिसेंबर रोजी एका सोसायटीत भिमाकोरगावला निघालेल्या मारहाण झाली होती. त्यांच्या मदतीला माझा भाऊ धावून गेला होता. तिथे गेल्यानंतर गायकवाड कुटुंबीयातील सदस्यांनी माझ्या भावाला मारहाण केली. त्याला तेव्हा कोणाची मदत मिळाली नाही. त्याला रुग्णालयातही कोणी नेलं नाही. गल्लीतील लोकांना धमकावलं होतं. त्यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. त्याला उशिरा रुग्णालयात दाखल केल्यामुळे त्याचा जीव गेला. माझ्या भावाला न्याय मिळो, ही अपेक्षा करते'.

## प्रबोधन

# गोड बोला' त्याने । देश होतो मोठा

'माणूस अडचणीत आला की, आपली सुटका करून घेण्यासाठी गोड बोलतो, हे सत्य प्रसंग आया बाका, तो गधे को कहे काका अशा लोकवचनातून प्रकट होतं. मृदंगो मुखलेपेन करोति मधुर ध्वनिम् अर्थात, मृदंगाच्या तोंडाला कणीक लावली की, तो थपडा खातानाही गोड बोलू लागतो, असं म्हणणाऱ्या संस्कृत पंडितांनी प्रतिक्रिया, प्रत्युत्तर, प्रतिसाद हुकमी आणि गोड हवा असेल तर दुसऱ्याला खाऊ द्या, खाऊ घाला हा लोकव्यवहार फार पूर्वी सांगून ठेवला आहे. कदाचित भ्रष्टाचाराच्या इतिहासाचं पहिलं पान त्यांनीच लिहिलं असेल. लाभ आणि लोभ याशिवायही एकमेकांविषयी गोड बोलता येतं का, हा मात्र नक्कीच संशोधनाचा विषय आहे.

राजहंस आणि बगळा यांच्याविषयी योगवाशिष्ठकाराने जे लिहिलं ते असं- 'राजहंसाने सहज केलेला मंजुळ कलरव बगळ्याला वर्षभर प्रयत्न करूनही शिकता येणार नाही.' हे वचन कावळ्याची निंदा करण्यासाठीही नाही आणि राजहंसाची स्तुती करण्यासाठीही नाही. वास्तविक ते अलंकारिक बोलणं माणसांचे गुणदोष व्यक्त करण्यासाठी आहे. त्याचा अर्थ, काही माणसं बगळ्यासारखे कटू, कर्कश बोलणारी असतात; तर काही राजहंसासारखी मधुरभाषी असतात. कटुभाषी मधुर बोलू शकणार नाहीत, हे या वचनामागील कटू सत्य आहे. एका संस्कृत सुभाषितकाराने तर अत्यंत वास्तववादी भूमिका व्यक्त करताना म्हटलं आहे, 'दातृत्व, धैर्य, प्रसंगावधान आणि गोडभाषीपणा हे गुण जन्मसिद्ध असून ते प्रयत्नसाध्य नसतात.' अशा परिस्थितीत प्रत्येकाकडून गोड बोलण्याची अपेक्षा करणं, हे योग्य आहे काय? गोड बोलण्याविषयीचं एक वचन तर भयंकरच आहे. काय तर म्हणे, सत्यं, ब्रुयात, प्रियं ब्रुयात, न ब्रुयात सत्यम् अप्रियम्! अर्थात, खरं बोला, पण ते खरं लोकांना आवडेल असं बोला. मात्र अप्रिय सत्य मात्र कधीही बोलू नका. सत्य हे कटू असतं, अप्रिय असतं, असं सर्व थोर लोक म्हणत असतात. त्यामुळे खरं बोलणाऱ्याला कटू बोलावं लागेल आणि गोड बोलणाऱ्याला सत्य सांगता येणार नाही, अशी ही विलक्षण कोंडी आहे, वास्तविक अशी ही विलक्षण कोंडी आहे, वास्तविक हे वचन प्रमाण मानून जगातील सर्व राजकीय नेते गोड भाषणात आभासी सत्य मिसळून बोलत असतात. भारतीय राजकीय नेत्यांची बरोबरी याबाबतीत जगातील कोणतेही नेते करू शकणार नाहीत, याचा आपण अभिमान बाळगावा की खेद करावा, हा कूटप्रश्न आहे.

जसा राजकीय सत्ताधारी नेता गोडबोल्या असतो, तसेच देशाच्या अनेक क्षेत्रातील मलई मटकावणारे बोकेनेतेही गोड गोड बोलत असतात. प्रणयी जोडपी मधाळ बोलतात. धार्मिक प्रवचनकार तर कमालीचे गोड बोलतात. आपल्या कामाला दुसऱ्याला जुंपणारे साखरपेरणीत पटाईत असतात. डॉक्टर, वकील, विमाएजंट, ग्राहकभक्षी मॉलचालक आणि सगळे अवैध, अनैतिक धंदे करणारे गोड बोलण्यावर भिस्त ठेवूनच जगत असतात. या धंदेवाईक गोडबोल्यांविषयी लोकमानसात तीव्र नाराजी, प्रचंड असंतोष खदखदत असतो. व्यावसायिक गोड पण असत्यभाषींविषयी एक सुभाषितकार म्हणतात, 'जगात गोडबोले लोक पुष्कळ असतात; पण अप्रिय आणि हितकारी बोलणारे आणि ते ऐकणारे मात्र संख्येने कमीच असतात. '

नफेखोर गोडबोल्यांनी जरी गोड बोलण्याविषयी जगाचं मत कलुषित केलं असलं, तरी गोड बोलणं हे एक समाजहितकारी जीवनमूल्य आहे, यात वाद नाही. अर्थात, गोड बोलण्याने जग जिंकता येतं, हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे. महाभारतकार म्हणतात, 'माणसाने मधुर भाषण केलं. तर त्यामुळे त्याची अनेक कल्याणकारी कामं साध्य होतील. पण कटू बोलण्याने मात्र अनर्थच होईल. मग कार्यसिद्धी कुठली?'

समतावादी महात्मा बसवेश्वर म्हणतात, ह्यगोड बोलणं हाच जप आहे आणि

तेच तपही आहे. गोड बोलण्याचं व्रत ज्याने

घेतलं त्याने दुसरं जप-तप करण्याची गरज

नाही.'

मकर संक्रातीला तिळगूळ घ्या, गोड बोला असा प्रेमळ आग्रह केला जातो. थोर पुरुष सामाजिक शांतता आणि एकोप्याची इच्छा नेहमीच व्यक्त करीत असतात. सामाजिक अभिसरण जेवढं सुरळीत होईल, तेवढी प्रगती समाज साध्य करू शकतो, हाच विचार तिळगूळ समारंभासारख्या उपक्रमामागे असतो. धार्मिक कर्मकांड वजा केलं, तरी तिळातील स्नेह आणि गुळाची गोडी

**कमी होत नाही. कारण-**

गोड बोला । असे कबीर म्हणती
कल्याणा जपती । समाजाच्या ॥ १
गोड बोलण्याने । वाढतसे प्रेम
चाले योगक्षेम । निश्चिंतीने ॥ २
गोड बोलण्याने । लोपे शत्रूभाव
वाढे स्नेहभाव जिव्हाळ्याचा ॥ ३
गोड बोलण्याने । एक होती मने
दूर गेली होती । चिरकाल ॥४
गोड बोलण्याने । होते संघटना
दुहीच्या वल्गना । दूर होती ॥५
'गोड बोला' त्याने । देश होतो मोठा
समृद्धीच्या वाटा । विस्तारती ॥६
गोड बोले त्याचे । चित्त शुद्ध होते
हाती दिव्य येते । समाधान ॥७
निःस्वार्थी प्रेमाने । जगा जो पाहातो
गोड शब्द येतो। मुखी त्याच्या ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# गोड बोलायाला । लागते न मोल

तिळगूळ घ्या गोड बोला हे वाक्य आपण अवघ्या तीन सेकंदात उच्चारू शकतो आणि दुसऱ्याच्या हातात तिळगूळ द्यायला फार तर दोन सेकंद लागतील. म्हणजे एकूण पाच सेकंदांचं हे स्नेहाचं आदान-प्रदान असतं. पण हे पाच सेकंद वर्षभर पुरून उरेल, इतकी प्रेमाची ऊर्जा उत्पन्न करू शकतात. पाच सेकंद म्हणजे एक क्षण! अशा एखाद्या दिव्य क्षणाला किती महत्त्व असतं, ते सांगताना एक विचारवंत म्हणतात, 'प्रसन्नता म्हणजे जीवन! प्रसन्नतेचा एक क्षण अनेक वर्षांबरोबर असतो. तो क्षण अमर असतो.' गोविंदाग्रजांच्या कवितेची सवंग प्रेमाच्या पांचट व्यवहारवाद्यांनी थोडी फरपट केली आहे. पण त्यांचं शुद्ध प्रेमाविषयीचं क्षण एक पुरे प्रेमाचा! हे मानवी व्यवहारातील महत्त्वाचं प्रेमभाष्य जगाच्या अंतापर्यंत आपला ताजेपणा टिकवून ठेवण्याइतकं रसदार आणि कसदार आहे.

जीवनाचा तात्त्विक पातळीवरून विचार करताना डॉ. राधाकृष्णन म्हणतात, 'जीवनाचं गूढरम्य वस्त्र परिस्थिती, संधी आणि स्वभावधर्म अशा तिहेरी धाग्यांनी विणलेलं असतं.' यातील पहिले दोन घटक माणसाच्या हातात नसतात. पण आपला स्वभावधर्म आपण हवा तसा वळवू शकतो, वाकवू शकतो. त्याला हवा तसा आकार देऊ शकतो. तेवढं जरी आपण केलं तरी आपण आणि समाज यातील व्यवहारात मधुरता आणि स्निग्धता येऊ शकते. आज सर्वसामान्यांची मनःस्थिती किती दूषित झाली आहे, हे सांगताना विचारवंत शिवाजीराव भोसले म्हणतात, ह्यआज परिस्थिती अशी आहे की, चांगल्याला चांगलं म्हणण्याची उभारी राहिली नाही; आणि वाइटाला वाईट म्हणण्याचं धैर्य कुणी दाखवत नाही. शेवटी आपणास सुधारणार कोण? तर आपले आपणच!'


या परिस्थितीवरील उपाययोजनेचा प्रारंभ प्रत्येकाने स्वतःपासून केला, तर थोरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा आपल्याला पूर्ण करता येतील. स्वामी विवेकनंद एक महान अपेक्षा व्यक्त करताना म्हणतात, 'आज आपणाला माणूस घडवणाऱ्या धमार्ची आवश्यकता आहे.' आजवर भारतीय समाजातील बहुतेकांचं शोषण मूठभर स्वयंघोषित उच्चवर्णियांनी करून सामाजिक स्नेहाभिसरणात मोठा अडथळा वेदकाळापासून ब्रिटिश राजवटीपर्यंत निर्माण केला. त्यामुळे हजारो वर्षं सूर्य बापडा मकर राशीत विनाकारणच गेला. कारण त्याच्यामुळे भारतात समाजसंक्रमण घडून आलंच नाही. महात्मा जोतिबा फुलेंच्या रूपाने उगवलेल्या सूयार्ने मात्र खरं संक्रमण घडवून आणलं. त्यांनी भूतकाळाची भुतं गाडून माणुसकीच्या नवसंस्कृतीचा पाया मजबूत करणारं संक्रमण प्रेमाच्या माध्यमातून केलं. त्यांनी अस्पृश्य आणि ब्राह्मण असा भेद केला नाही. सनातन्यांनी जोतिराव-सावित्री या दांपत्यावर आगपाखड केली आणि आजही ते करतात. पण जोतिरावांनी ब्राह्मण विधवा स्त्रीचा अनौरस मुलगा दत्तक घेऊन त्याला आपलं जीवनसर्वस्व बहाल केलं.

'प्रेमयोग' कवितेतून कुसुमाग्रजांनी प्रेम कुणावरही करता येतं असं म्हटलंय. जोतिरावांनी मित्र-शत्रू सर्वांवर प्रेमच केलं. त्यांचा आदर्श समोर ठेवून तर ही कविता लिहिली गेली नसेल? कुसुमाग्रजांच्या मते, राधेच्या वात्सल्यावर प्रेम करता येतं आणि कुब्जेच्या कुरूप कुबडावरही करता येतं, दुर्योधन-कर्णाच्या अभिमानीपणावरही प्रेम करता येतं आणि भीष्म- द्रोणाच्या थोरपणावरही करता येतं, बलरामाच्या नांगरावर आणि कंसाच्या हृदयातील कृष्णद्वेषावरही करता येतं. शेवटी कवी म्हणतात, प्रेम आहे माणसाच्या संस्कृतीचा सारांश ! माणसाच्या भविष्यकाळातील अभ्युदयाची एकमेव आशा !!

प्रेमसंदेशाचा प्रसार ही आता काळाची निकडीची गरज झाली आहे. अतिरेकी- आत्मघातकी-जिहादींच्या द्वेषाचे काळेकुट्ट ढग जगाला भेडसावत आहेत.

विश्वप्रेमी विचारवंतांच्या विचाररूपी वाऱ्यातच या ढगांना पळवून लावण्याचं सामर्थ्य आहे. आत्मघातकी, अतिरेकी ज्या स्वर्गाची स्वप्नं बंद डोळ्यांपुढे पाहातो आणि उघड्या डोळ्यांपुढे त्यासाठी संहाराचं तांडव मांडतो; तोच प्रयोग भारतीय संस्कृतीच्या नावाने आणि थोड्या वेगळ्या प्रकारे आजवर केला गेला. ही तथाकथित भारतीय संस्कृती उघड्या डोळ्यांपुढे स्वर्गाची स्वप्नं पाहाते आणि बंद पापण्यांमागे देवाधमार्ने केलेली सुखी संसाराची वाताहत लपवत असते. एकूण दोघंही स्वर्गाची स्वप्नं पाहून जगातील सुखाला मुकलेत. या दोन्ही प्रवृत्तींना त्यांची पावलं जमिनीवरच असली पाहिजेत, हे भान आणून द्यायचं असेल, तर त्यासाठी स्नेहाचं आदानप्रदान करणारे तिळगूळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. त्याआधी स्वच्छ मनाने जगाकडे पाहण्याची सवय लागणं अगत्याचं आहे. चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। वाघही न खाती सिंह तया । असा शुद्ध चित्ताचा महिमा आहे. तिळगूळ घ्या, गोड बोला, या विनंतीमागे जगद्गुरू तुकारामांनी जी जगाच्या कल्याणाची तीव्र इच्छा वारंवार प्रकट केली, तीच कार्यरत असते. समाजाचं अखंड कल्याण व्हावं म्हणून हा संत वारंवार विनंती करतो, सकळांच्या पाया माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा ॥ म्हणून ध्यानात घ्या-

क्षण एक वेचा । देण्या-घेण्या प्रेम ।
समाजाचे क्षेम । साधावया ॥ १
प्रेमाचा व्यापार । पुरे क्षणाचाही ।
दुःख दूर होई । आयुष्याचे ॥ २
इतरांना सुखी । कराया तत्पर ।
तोच खरा वीर । जीवनाचा ॥३
शेजाऱ्याच्या घरा । आग लागे जर ।
तापणार घर। आपुलेही ॥४
भिन्न धर्म, पंथ । सोडा जात-पात ।
ऐक्य समाजात। नांदण्यास ॥५
जगाचा नरक । झालासे द्वेषाने
निर्मू या प्रेमाने । स्वर्ग येथे ६
गोड बोलायाला । लागते न मोल।
मनी थोडी ओल। जपा त्यासाठी॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# होटगीच्या लघुपाटबंधारे विभागाच्या पाझर तलावातून शेतकऱ्यांसाठी पहिले आवर्तन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- होटगीच्या लघुपाटबंधारे विभागाच्या पाझर तलावातून शेतकऱ्यांसाठी पहिले आवर्तन सोडण्यात आले आहे. होटगी तलावात सध्या ८४ टक्के इतका पाणीसाठा असून, शेती पिकांसाठी हे पाणी सोडण्यात आले आहे. असून साधारणतः २० ते २५ दिवस चालू ठेवण्यात येणार आहे. रावळसिद्ध पाणी वापर संस्थेच्या मागणीवरून होडगे तलावातून हे आवर्तन सोडण्यात आले आहे.



शेतकऱ्यांची आणखीन मागणी असेल तर आणखीन पाच दिवस वाढीव देण्यात येईल होटगी : पाझर तलावातून शेतीसाठी सोडण्यात आलेले पहिले आवर्तन.

उन्हाळ्यातील पिकांसाठी दुसरे आवर्तन उपलब्ध पाणीसाठा पाहून निर्णय घेण्यात येईल. असे लघुपाटबंधारे विभागाचे सहायक अभियंता वाकचौरे यांनी सांगितले.या पाण्याचा रब्बी पिकांसाठी फायदा होणार असून याचबरोबर नवीन पिकांच्या लागवडीसाठी देखील लाभ होणार आहे.तलावातून कॅनलद्वारे पहिले आवर्तन सोडण्यात आल्यामुळे याचा लाभ होटगीसह मद्रे गावातील शेतकऱ्यांना होणार आहे.

# अक्कलकोट ; आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून तीन रस्ते नगरोत्थान योजनेतून मंजूर



**अक्कलकोट(कटूसत्य वृत्त):-** येथील शहरात आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून तीन रस्ते नगरोत्थान योजनेतून मंजूर झाले होते. त्यासाठी ११४ कोटी रुपए निधी उपलब्ध झाला

असून आता रस्त्याची कामे सुरू झाल्याची माहिती अक्कलकोटचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली. अक्कलकोट हे श्री स्वामी समर्थांचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे महाराष्ट्रासह देशातील भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. त्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात व शहरातील रस्ते प्रशस्त व्हावेत म्हणून आमदार कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून ११४ कोटी रुपए मंजूर झाले आहेत.

त्यामध्ये एम.एस.ई.बी. चौक ते श्री स्वामी समर्थ मंदिर चौक,मंगरूळे हायस्कूल चौक ते कारंजा

चौक, एम.एस.ई.बी. चौक हन्नूर रोड बायपास असे तीन मुख्य रस्त्यांच्या कामांसाठी ११४ कोटी रुपए मंजूर झाले असून मंगरूळे हायस्कूल चौक ते कारंजा चौक ह्या रस्त्याचे काम आता सुरू आहे. फत्तेसिंह मैदानासमोर एकेरी वाहतूक करून या रस्त्याचे काम सुरू झाल्याने सामान्य भाविक व नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

नगरोत्थान महाभियानांतर्गत अक्कलकोट नगरपरिषदेने ११४ कोटी इतक्या किमतीचे रस्ते विकास प्रकल्प सादर केलेला होता. हा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला होता. तो विषय आता मार्गी लागला आहे. एम.एस.ई.बी. चौक ते हसापूर रस्ता मार्गे हन्नूर नाका (१७ वाहतूक सुकर होण्यासाठी अक्कलकोट शहरातील श्री स्वामी भक्तांसाठी असलेली दळणवळण सुविधा सुकर आणि आरामदायी होण्यासाठी या चार प्रमुख रस्त्यांच्या बळकटीकरणाची अत्यंत आवश्यकता होती. संपूर्णतः मार्गी लागले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. या कामांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सहकार्य मिळाले. सचिन कल्याणशेट्टी, आ.कोटी रुपये), एम.एस.ई.बी. चौक ते मंगरुळे बायपास चौक ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ चौक रस्ता (४७ कोटी २४ लाख), मंगरुळे बायपास चौक ते कारंजा चौक रस्ता (२४ कोटी १५ लाख रुपये) व इतर विस्तारीकरण रस्ता ३ कोटी ७२ लाख असे एकूण ११४ कोटी रुपयांचे विकासाचे काम अक्कलकोट शहरात होणार आहे. अक्कलकोट तत्कालीन महायुती शासनाने रस्ते प्रकल्प मंजूर केला होता. त्यातून शहरातील बहुतांश नवीन रस्ते केले होते.

मात्र, यातील काही रस्ते खराब झाले होते. आता नव्या प्रकल्पाच्या मंजुरीमुळे शहरात पुन्हा रस्ते चकाचक होणार आहेत. सर्व रस्ते पूर्ण झाल्यानंतर शहराचे सौंदर्य आणि दळणवळण सुविधा आणखी वाढण्यास मदत होणार असल्याचे माजी नगरसेवक मिलन शहरासाठी कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# 'इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. यात ५५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.'शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा' हे यंदाचे विशेष आकर्षण होते. यात इयत्ता पाचवीच्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. शिवजन्म सोहळा, शिवरायांचे बालपण, शिवरायांची स्वराज्य स्थापनेची शपथ, शिवाजी महाराज अफझलखान भेट,आग्याहून सुटका, शाहिस्तेखानाचा पराभव या ऐतिहासिक प्रसंगांचे हुबेहुब सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. तसेच वडील व मूलीच्या नात्या संबंध दृढ करणारा प्रसंग फादर डॉटर थीममधून दाखवण्यात



आला. कृष्णलीला नाटिका, वंदेमातरम,फेदर डान्स, आर्मी थिम डान्स, फ्रेंडशिप साँग, अंब्रेला डान्स अशा विविध नृत्यांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी नवदुर्गा गाण्याच्या माध्यमातून देवीच्या विविध रुपांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. यामध्ये हावभाव, वेशभूषा, शस्त्र इत्यादींचे हुबेहुब सादरीकरण होऊन नवरसांची निर्मिती केली गेली व कलात्मक पध्दतीने रंगभूषा करण्यात आली होती. याप्रसंगी प्रशालेचे संस्थापक ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, पोलिस आयुक्त एम.राजकुमार, उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव, पोलीस उपायुक्त अजित बोराडे, विजय कबाडे, पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर, न्यायाधीश जयश्री काकडे,एसीपी प्रांजल सोनावणे, तहसीलदार श्रीकांत पाटील, शिल्पा ओसवाल, मुख्याध्यापिका मानसी जोशी, अपर्णा कुलकर्णी, अदिती कुलकर्णी, सुजाता बुटटे, अचला राचर्ला, ममता बसवंती, रुही काझी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पंढरपुरातील शेतकऱ्यांना ११ कोटीहून अधिक रक्कम वाल्मीक कराडने फसविले

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरसह पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना ऊसतोड मशिन (हार्वेस्टर) ची ३६ रुपयांची अनुदान (सबसिडी) मिळवून देतो म्हणून सुमारे सोलापूर जिल्ह्यातील ४० हून अधिक तर इतर जिल्ह्यातील असे मिळून १४० जणांकडून प्रत्येकी ८ लाख रुपये याप्रमाणे ११ कोटीहून अधिक रक्कम वाल्मीक कराड व त्याच्या साथीदारांनी घेऊन फसवणूक केली आहे. कराड याला याबाबत वेळोवेळी विचारले असता मारहाण,धमकावल्याचे शेतकऱ्यांनी सांगीतले. याप्रकरणी पंढरपुर येथील शेतकऱ्यांनी पंढरपूर पोलिसांत तक्रारी अर्ज दिला आहे. यामुळे वाल्मीक कराड चे पंढरपूरपर्यंत जाळे पसरल्याचे दिसून येते. हार्वेस्टर मालक आण्णासाहेब शिवाजी बागल रा. गादेगाव (ता.पंढरपूर), दिलीप नागणे (उपरी),कल्याण बोदराज मोरे (मुंडेवाडी),राजेंद्र मल्हारी गांडोळे (राजणी), अशोक तुकाराम सावंत (पिराची कुरोली)

उपरी येथील दिलीप नागणे यांनी शनिवारी तक्रार अर्ज दिला आहे. वाल्मीक कराड व त्यांच्या साथीदारांनी राज्यातील १४० जणांकडूनप्रत्येकी ८ लाख रुपये याप्रमाणे हार्वेस्टर या ऊसतोड यंत्रासाठी अनुदान मिळवून देतो म्हणून पैसे घेतले. पैसे घेतल्याचा हा गुन्हा मुंबई येथे घडला आहे. अनुदान मिळाले नाही, घेतलेले पैसे देखील माघारी दिले नाहीत. अशाप्रकारे आर्थिक फसवणूक झाल्याचे पुरावे दिले तर फसवणुकीचा ४२० अंतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. या तक्रारी अजार्ची अगोदर चौकशी करण्यात येईल.- शिरीष हुंबे, पोलिस निरीक्षक, पंढरपूर ग्रामीण

हे पंढरपूर तालुक्यातील तर इतर १० ते ११ जण हे माळशिरस, मंगळवेढा, सांगोला तालुक्यातील शेतकरी व हार्वेस्टर मशीन मालक आहेत. यांनी शनिवार दि. ११ रोजी तक्रारी अर्ज दाखल केला आहे. सप्टेंबर २०२३ रोजी पनवेल येथील देवीस रेसिडेन्सी येथे यातील पाच जणांना एका

महिन्यात ३६ लाख रुपयांचे अनुदान मिळवून देतो, म्हणून प्रत्येकाकडून ८ लाख रुपये वाल्मीक कराड तसेच त्याचे १४० हार्वेस्टरची सबसिडी मिळवून देण्यासाठी घेतले प्रत्येकी ८ लाख साथीदार नामदेव सानप, जितेंद्र पालवे यांनी घेतले आहे. परंतु, तीन महिने होऊनही अद्याप अनुदान (सबसिडी) मिळाली नाही. आमचे पैसेही मिळाले नसल्याचे हार्वेस्टर मशीनधारक आरोप करत आहेत. त्यामुळे त्यांनी पंढरपूर पोलीसात वाल्मीक कराड याच्या विरोधात तक्रारी अर्ज दिला आहे. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या

माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील ४० हून अधिक तर इतर मिळून १४० ऊस तोडणी यंत्र मालकांना ३६ लाख रुपयांचे अनुदान मिळवून देतो, असे कराड याने आश्वासन दिल्याचे यंत्रमालकांनी तक्रारी अर्जात म्हटले आहे.

# बार्शी मुक्कामी असलेल्या वाघाला पकडण्याचा आदेश

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** सरकारच्या वन संरक्षण विभागाने बार्शी तालुक्यासह उस्मानाबाद

जिल्ह्यात वावर असलेल्या वाघाला पकडण्याचे आदेश अखेर जारी केले आहेत. या

आदेशानंतर वाघ पकडण्यासाठी येणाऱ्या रेस्क्यू टीमसमोरदेखील हे मोठे आव्हान असणार आहे. बार्शी तालुक्यात जीव मुठीत घेऊन जगणाऱ्या नागरिकांना आता ताडोबा येथील रेस्क्यू टीम बार्शीत कधी दाखल होणार याची प्रतीक्षा आहे.येडशी घाटासह उस्मानाबाद जिल्हा तसेच सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून वाघ मुक्कामी आहे. टिपेश्वर अभयारण्यातून

आलेल्या या वाघाचा प्रवास बार्शी तालुक्यातील एका गावातून दुसऱ्या गावात सुरू राहिला

आहे. बार्शी तालुक्यातील कारी, ढेंबरेवाडी, चारे यानंतर वैराग भागात या वाघाने प्रवेश केला. प्रवेश केल्यानंतर तेथील पाळीव प्राण्यांवर हल्ला करून त्यांची शिकार केली. वाघाचा तालुक्यातील हा वावर नागरिकांना चिंतेत टाकणारा असल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण आहे.बार्शी वन विभागाने ट्रॅप कॅमेरे

लावण्यापलीकडे ठोस काही केले नाही. शिवाय वन संरक्षण विभागाचे पुढचे आदेशही

त्यांच्याकडे नव्हते. बार्शी व सोलापूर वन विभागाकडून यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे परवानगी

मागितली. तब्बल पंधरा दिवसांनी बार्शी तालुक्यात धुमाकूळ घालत असलेल्या या वाघाला पकडण्याचे आदेश अखेर काढण्यात आले. हे आदेश काढल्यानंतर लागलीच वाघाला पकडणे सहजशक्य नसून त्यासाठी ताडोबा येथील प्रशिक्षित रेस्क्यू टीम योग्य ती काळजी घेत ही मोहीम आखणार आहे.तत्पूर्वी बार्शी व सोलापूर वन विभागाच्यावतीने वैराग भागातही आता ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत. तालुक्यात वावर असलेला हा वाघ पडकण्यासाठी त्याचे नेमके ठिकाण कोणते हे शोधण्याची मुख्य जबाबदारी रेस्क्यू टीमवर असणार आहे.बार्शी वन विभाग या टीमच्या सोबत असणार आहे. अद्याप तरी ही टीम बार्शीत दाखल झालेली नसून बार्शीत या टीमचा मुक्काम असणार आहे. ताज्या बातमीनुसार वाघाचा नेमका मुक्काम कोणत्या भागात आहे याचा शोध घेऊन आवश्यक ती सुरक्षिततेची साधने सोबत घेऊन ही रेस्क्यू टीम मोहीमेसाठी पुढे सरसावणार आहे.

# ग्रामीण पोलिसांचा उपक्रम दुसऱ्या आठवड्यात १०१२ तक्रारींचा निपटारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून सोलापूर ग्रामीण पोलीस दलात सुरू करण्यात आलेल्या तक्रार निवारण दिनाच्या दुसऱ्या आठवड्यात १०१२ तक्रारींचा निपटारा करण्यात यश आले आहे.

यामध्ये सर्वाधिक २०९ तक्रारी तर सर्वात कमी १११ अकलूज उपविभागात तक्रारी निकाली निघाल्या आहेत.या उपक्रमाचे आयोजन शनिवारी सर्व पोलीस ठाणे स्तरावर करण्यात आले होते. या तक्रार निवारण दिनामध्ये पोलीस ठाण्यास प्राप्त तक्रारी अजार्तील अर्जदार व गैरअर्जदार यांना चौकशीसाठी हजर राहण्याबाबत समज देण्यात आली होती.

त्यावरुन शनिवारी प्रत्येक पोलीस ठाणे येथील विशेष कक्षात उपविभागीय पोलीस अधिकारी,पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष दुय्यमअधिकारी व बीट अंमलदार यांनी समुपदेशन, चचेर्तून यातून तक्रारी व अजार्ची निर्गती करण्यात आली आहे.या तक्रार निवारण दिनामध्ये जिल्ह्यातील उपविभागानुसार निकाली झालेल्या अजार्ची माहिती पुढीलप्रमाणे-एसडीपीओ सोलापूर- १८८,अक्कलकोट-११५, बार्शी-१४०, करमाळा-२०९, पंढरपूर-१३०,मंगळवेढा-११९,अकलूज- १११ एकूण १०१२.सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात अशाप्रकारे एकूण १०१२ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.तसेच यापूर्वी ४ जानेवारी रोजीच्या तक्रार निवारण दिनामध्ये ८३७ तक्रारींचा निपटारा करण्यात आला होता. या उपक्रमाची यशस्वीता पाहता यापुढे आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

# कोर्टी ग्रामपंचायत वतीने दिव्यांग व्यक्तींना 5% निधीचे वाटप



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथे ग्रामपंचायत यांच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना पाच टक्के निधीचे वाटप करण्यात आले. कोटी ग्रामपंचायत ने दरवर्षीप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायत यांच्या स्व निधीतून 50 दिव्यांग व्यक्तींना, प्रत्येक 2300 रुपये प्रमाणे निधीचे वाटप, कोटीचे सरपंच यांच्या मार्गदर्शनाखाली व , सरपंच उपसरपंच , ग्रामपंचायत सदस्य माजी उपनगराध्यक्ष व ग्रामपंचायत अधिकारी, एस एन इंगोले यांच्या हस्ते उपस्थित दिव्यांग व्यक्तींना चेक वाटप करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच समाजसेवक राजू पवार, माजी सरपंच रामभाऊ मिसाळ, माझी उपनगराध्यक्ष, निलराज डोंबे, माझी सरपंच रघु पवार, कोर्टी ग्रामपंचायतचे सदस्य, मधुकर वाघमारे सिकंदर मुलानी, पोपट हाके बाळू व्हनकडे धनाजी सकटे, भारत पवार बापू मिसाळ सर राजू बाबर दिनेश चव्हाण सुरज लवटे श्रीनाथ बाबर अण्णा लवटे महिला बचत गट प्रतिनिधी बायडाबाई हाके ग्रामपंचायत लिपिक जमीर शेख ग्रामपंचायत कर्मचारी व दिव्यांग व्यक्ती व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३१ मुलींच्या नावे माँसाहेब जिजाऊ सुकन्या योजने अंतर्गत प्रत्येकी ५०० रुपये भरून खाते सुरू

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त येथील जय शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने ३१ मुलींच्या नावे माँसाहेब जिजाऊ सुकन्या योजने अंतर्गत प्रत्येकी ५०० रुपये भरून खाते सुरू करण्यात आले. व त्या खात्यांचे पासबुक वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.मुलींच्या शिक्षणासाठी व पुढील भविष्यासाठी हे खाते सुरू करण्यात आले.माँसाहेब जिजाऊ व थोर महापुरुषांच्या विचारांचा वारसा या कार्याच्या माध्यमातून समाजात रुजवण्याचे संघटनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून भविष्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात या



योजनेमध्ये मुलींचा सहभाग घेतला जाईल असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते माँ साहेब जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर विविध मान्यवरांचे मनोगत व पासबुक तसेच माहितीपत्रक वितरण करून कार्यक्रम झाला.यावेळी माजी आ. राजेंद्र राऊत,सहायक पोलिस उप निरीक्षक सिंधू देशमुख, ॲड. राजश्री डमरे, शैलजा गीते, संतोष बारंगुळे, रवी राऊत,गोरख यादव, माधवराव देशमुख, सचिन वायकुळे, बाबा कापसे, अमृत राऊत, कुमार डमरे, उमाकांत राऊत, महेश देशमुख, किरण कोकाटे, अजय पाटील, ॲड. गणेश हांडे, धीरज गरजू मुलींचा शोध घेऊन मदत गेल्या पंधरा दिवसांमध्ये अनेक गरजू मुलींची परिस्थिती जाणून त्यातील ३१ गरजू मुलींचा या योजनेत सहभाग घेऊन त्यांच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता संघटनेच्या माध्यमातून पोस्टऑफिसमध्ये करून प्रत्येक खात्यात ५०० रुपये जमा करण्यात आले. शेळके, बालाजी, कानगुडे, पोस्ट अधिकारी राहुल जाधव, रविंद्र बगाडे, अजित नडगिरे याच्यासह शिवभक्त व जय शिवराय प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जय शिवराय प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# 'भैरवनाथ'चा २८०० पहिला हप्ता खात्यात जमा-चेअरमन सावंत

**नंदेश्वर (कटूसत्य वृत्त):-** भैरवनाथ शुगर वर्क्स लि., युनिट नं.३, लवंगी, या कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मधील १५ डिसेंबर पर्यंतचे उसाचे बिल प्रति मे. टन २८०० रूपयाप्रमाणे शेतकरी उस उत्पादकांच्या खात्यात जमा केल्याची माहिती भैरवनाथ शुगरचे चेअरमन प्रा. शिवाजीराव सावंत यांनी दिली.भैरवनाथ शुगर उद्योग समूहाचे संस्थापक माजी आरोग्यमंत्री आ. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या नेतृत्वाखाली व चेअरमन प्रा. शिवाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली २०२४-२५ च्या चालू हंगामातील गाळप सुरू झाले असून शेतकऱ्यांना पहिली उचल २८०० प्रती मे.टन दिली जाणार आहे. शेतकऱ्यांचा सर्व ऊस गाळपासाठी प्रोग्रामप्रमाणे नेला जाणार असून चांगल्या प्रतिचा ऊस पुरवठा कारखाण्यास करावा, असे आवाहनही प्रा.सावंत यांनी केले. तसेच एफआरपी पेक्षा जास्त दर आतापर्यंत दिलेला



आहे. शेतकऱ्यांनी आजपर्यंत दाखवलेल्या विश्वासावरच भैरवनाथ शुगरचे विक्रमी गाळप होईल, असे त्यांनी सांगितले. व्हा. चेअरमन अनिल सावंत म्हणाले, भैरवनाथ शुगरने सुरुवातीपासुन ऊस उत्पादकांशी असलेली बांधीलकी कायम ठेवत त्यांना दिलासा देण्याचे काम केले आहे. ऊस उत्पादकांनी आपला जास्तीत जास्त ऊस कारखान्याकडे गाळपासाठी पाठवावा.यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत, जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

# शासकीय व खाजगी आस्थापनांवरील कर्मचाऱ्यांची त्रैमासिक सांख्यिकी माहिती

## 31 जानेवारी पर्यंत सादर करा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातील कायद्यांतर्गत असणाऱ्या आस्थापनांनी त्याच्या आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची त्रैमासिक विवरण नमुना ईआर-1 ची सांख्यिकी माहिती 31 जानेवारीपर्यत ऑनलाईन पद्धतीने सादर करा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले.

सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) कायदा 1959 व नियम 1960 च्या कलम 5(1) नुसार प्रत्येक तिमाहीस विहीत नमुना ईआर-1 मध्ये नियमीतपणे कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने तिमाही नमुना ईआर-1 (एफ-1) मधील त्रैमासिक सांख्यिकिय माहिती नोदणीकृत सर्व आस्थापनांनी यापुर्वी दिलेल्या युझर नेम व पासवर्डचा वापर करुन www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर त्रैमासिक विवरण पत्र विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने सादर करावे.

तसेच प्रत्येक आस्थापनेने आपला नोंदणी तपशील, आवश्यक सर्व माहीती नोंदवून अद्यावत करावा.

त्रैमासिक ईआर-1 किंवा आपला नोंदणी तपशील अद्यावत करतांना कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक सोलापूर (0217-2992956) या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले केले आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी 26 जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर ,(कटूसत्य वृत्त):-** क्रीडा विभागामार्फत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांमध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम, दिव्यांग खेळाडू व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्यासाठी 26 जानेवारीपूर्वी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नियमावलीनुसार सन 2022-23 या वषार्साठीच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी, दिव्यांग खेळाडू आदींकडून दि. 14 ते 26 जानेवारी या मुदतीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना 2 एकर बागायत किंवा 4 एकर जिराईत जमीन 100 टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिर्द्य रेषेखालील व कुटुंब प्रमुखाचे वय 60 वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील 60 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद् रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवगार्तील परित्यक्ता स्त्रिया, दारिद् रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया, अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटुंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वताः जमीन कसणे आवश्यक आहे. सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना लाभ देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयास जमीन खरेदी करावयाची आहे. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी.जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल 5 लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल 8 लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या 7/12 व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त् समाज कल्याण, कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा. तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसुचित जाती नवबौध्द घटकातील पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांच्या कार्यालयाकडे दाखल असे आवाहनही समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.